REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# 'व्यक्ती आणि वल्ली': साहित्याचे स्वरुप व मुल्यमापन

प्रा. डॉ. पांडुरंग एकनाथ शिवशरण
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, तुळजापुर,
जि. उस्मानाबाद (महा.)

## ❖ प्रास्ताविक :

मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटविणारे एक प्रतिभासंपन्न व अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणजे पु.ल. देशपांडे होय. मराठी विनोदाचे खरे जाणकार असणारे पु.ल. देशपांडे यांनी मराठी वाङ्मयाला आपल्या प्रतिभासंपन्नेतेने समृद्ध केले आहे. कथा, कादंबरी, नाटक, व्यक्तिचित्र, प्रवासवर्णने, इ. वाङ्मयप्रकारांची पु.लं. नी विपूल निर्मिती केली 'व्यक्ती आणि वल्ली' व्यक्तिचित्रे या संज्ञेने संबोधले गेलेले हे लेखन गेल्या पाच-सहा दशकात वाचकांच्या समोर आले. १९६२ साली लिहिलेल्या या व्यक्तिचित्रण कथासंग्रहास १९६५ सालचा 'साहित्य अकादमी' पुरस्कारही मिळालेला आहे.

पु.ल. देशपांडे यांनी व्यंकटेश माडगूळकर (माणदेशी माणसं), विद्याधर पुंडलीक (आवडलेली माणसे), यांच्या परंपरेवर आपले लेखन करुन एक वेगळीच छाप पाडली आहे. पु.ल.देशपांडे यांनी मराठी साहित्यविश्वाला आपल्या या व्यक्तिचित्रण कथासंग्रहातून मानवी स्वभावाच्या विविधांगांचे, पैलूंचे दर्शन घडविले आहे. म्हणूनच त्यांच्या व्यक्तिचित्रण संग्रहास 'साहित्य अकादमीने' ही गौरविले आहे. आपल्या समकालीन स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करुन देणारे पु.ल. देशपांडे आजही मराठी वाचक, रसिकांच्या मनावर राज्य करताना दिसतात.

पु.ल. देशपांडे यांनी तुका म्हणे आता, अमंलदार भाग्यवान, तुझे आहे तुजपाशी, सुंदर मी होणार, तीन पैश्याचा तमाशा, राजा ओयिदपौस, एक झुंज वाऱ्याशी, ती फुलराणी, वटवट वटवट द्विदलं, मोठे मासे छोटे मासे, विठ्ठल तो आला आला, आम्ही लटके ना बोलू, वय मोठे खरे, नवे गोकुळ, पुढारी पाहिजे, अपुर्ण ई, पुर्वरंग, जावे त्यांच्या देशा, व्यंगचित्रे, खोगिरभरती, नस्ती उठाठेव, गोळाबेरीज, हसवणूक, बटाट्याची चाळ, असा मी असामी, खिल्ली, कोट्याधीश पु.लं, अघळपगळ, उरलंसुरलं, परचूंडी, एक शुन्य मी, मुक्काम शांतीनिकेतन, मराठी वाङ्मयाचा (गाळीव) इतिहास, चित्रमय स्वागत, रसिकाहो, मित्रहो, श्रोतेहो, सृजनहो, रेडिओवरील भाषणे आणि श्रुतिका, भाग १, चार शब्द दाद, व्यक्ति आणि वल्ली, गणगोत, गुणगाईन आवडी मैत्र, आपुलकी, गांधीजी, एका कोळीयाने, काय वाट्टेल ते होईल, कान्होजी आंग्रे, टेलिफोनचा जन्म, स्वर्ग, पोरवय इ. विपूल आणि समृद्ध वाङ्मयनिर्मिती पु.ल. देशपांडे यांनी केलेली आहे. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, ललितलेखन, व्याख्याने, व्यक्तिचित्रण, असे वाङ्मयाचे विविध प्रकार हाताळणारे पु.ल. देशपांडे मराठी वाङ्मयाच्या परिघात विशेषच नावाजले गेले आहेत. मानवी स्वभावाच्या वृत्ती प्रवृत्तीचे अतिशय प्रभावीपणे रेखाटन पु.लं. नी त्यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या साहित्यकृतीतून साकारले आहे, म्हणूनच पु.लं.च्या समकालीनात मराठी वाङ्मयाच्या विश्वात त्यांनी स्वतःच्या नावाचा ठसा उमटविला आहे.

'व्यक्ती आणि वल्ली' हा व्यक्तिचित्रणात्मक कथासंग्रह असून, यातून पु.लं. च्या व्यक्ति स्वभावचिंतनातून साकारलेल्या मानवी प्रवृत्तीचे अतिशय विनोदी अंगानी दर्शन घडविले आहे. जीवनाच्या प्रवासात विनोदी आढळलेल्या व्यक्तींच्या चित्रणाला पु.लं. च्या प्रतिभेने अतिशय परिणामकारक बनविले आहे. जीवनात भेटत गेलेल्या व्यक्तींना मी कसा चित्रित गेलो हे सांगताना पु.ल. म्हणतात, "एकोणीशे चव्वेचाळीस साली 'अभिरुची' त मी 'भैय्या नागपूरकर' नावाचे एक लहानसे व्यक्तिचित्र लिहिले. तेव्हापासून एकसष्ट सालापर्यंत ही व्यक्तिचित्रे आहेत. विसावे शतक चाळीशित शिरले तेंव्हा मी विशित शिरलो होतो आणि शतकाने साठी ओलांडली आणि मी चाळिशीत आलो" आपल्या जीवन प्रवासात या व्यक्तिचित्रणाला कसा प्रांरभ झाला हे पु.ल. नी अतिशय नेमकेपणाने मांडले आहे. पु.ल. देशपांडे यांनी 'अभिरुची' मासिकातून आपले पहिले व्यक्तिचित्र साकार केले आणि जाणकार वाचक मंडळींना विचारप्रवृत्त केले या काळात विनोदाच्या क्षेत्रावर नाव कोरलेले अनेक मान्यवर होते. यात प्र.के. अत्रे, शामराव ओक, चि.वि. जोशी या मानकऱ्यांची प्रमुख नावे सांगता येतील. असे हे विनोदवीर जनतेच्या मनावर खोलवर रुजले होते. तरीही पु.लं. यांचे कसब वेगळे आणि डोळ्यात भरण्यासारखे होते. पु.लं च्या नव्या अविष्काराला भरपूर प्रतिसाद मिळत गेला आणि



समकालीनात पु.लं. चे विशेष नावं चर्चिले जाऊ लागले. पु.लं.च्या प्रतिभेचा अनेकांगी विकास व विस्तार झाला. त्यांच्या प्रतिभेने विविध ढंग परिधान केले. संगीत, रंगभूमी, चित्रपट अशा साऱ्याच क्षेत्रात त्यांची प्रतिभा, संपन्नता दिसून येते.

पु.लं. नी मानवी जीवनाला त्यांच्या व्यवहाराला खूप जवळून पाहिले. जीवनाच्या एकसुरीपणाला दूर सारुन विविध तऱ्हा धुंडाळल्या आणि कल्पक नजरेने माणसातील विसंगती हेरली. त्या विसंगतीतील इतक्या प्रत्ययकारीतेने मांडले की, साऱ्या महाराष्ट्रभर विनोदाची लाट पसरली. पु.ल. देशपांडे मराठी साहित्यविश्वाला सर्वांगाने परिचयाचे झाले. पु.लं.नी जीवनातील विसंगती साकारतानाच मानवी स्वभावाचे विविध नमुने अतिशय कल्पक बुद्धीने शब्दबद्ध केले, म्हणून 'मराठी विनोदाचे राजे' असे पु.लं. ना संबोधले तर अतिशयोक्ती वाटू नये.

मानवाच्या जीवनातील विसंगतीतील अतिशय नेमकेपणाने हेरणारे पु.ल. विसंगती हा मानवी स्वभावाचा गुणधर्मच कसा आहे? हे दाखवून देतात. पु.लं. नी 'व्यक्ती आणि वल्ली' साकारत असताना अंतर्मुख करणाऱ्या विनोदाला केंद्रस्थानी ठेवल्याने त्यांच्या विनोदाची परिणामकारकता एवढ्या मोठ्या प्रमाणावर सिद्ध झाली की, या पुस्तकाच्या सन २०१० पर्यंत तब्बल तेहत्तीस आवृत्या निघाल्या. या पुस्तकाने मानवी मनाचा ठाव कशा पद्धतीने घेतला याचा अंदाज येऊ शकतो.

पु.ल. देशपांडे यांनी आपल्या या व्यक्तिचित्रण संग्रहातून माणुसकीची जाण ठेवून वीस व्यक्ती आणि त्यांच्या वल्ली रेखाटल्या आहेत. या व्यक्तिरेखा पु. लं. च्या आतून उमलून आलेल्या आहेत आणि या साकार झाल्या त्या केवळ आणि केवळ निखळ मनोरंजन करण्याच्या हेतुने. या विनोदातही पु.लं.च्या निरीक्षणशक्तीची ओळख होते. त्यांच्या नेमकेपणाचाही अभ्यास होतो. हे सांगतानाच प्रा. सुधीर जोशी म्हणतात, " पु.लं. ची निरीक्षणशक्ती केवळ अपारच नाही तर ती नेमकी व मार्मिकही आहे. व्यक्ती आणि वल्लीत ही निरीक्षणशक्ती आपणाला प्रदेश, भाषा, संस्कृती, सभ्यता व चिरंतन मुल्यांची अनोखी सफर घडवून आणते." प्रा. जोशी यांनी पु.लं. च्या नेमकेपणाला आधोरेखीत करतानाच त्यांच्या दृष्टीकोनालाही विशद केले आहे. पु.लं. मानवी प्रवृत्तीला आधोरेखीत करतानाचा भाषा, संस्कृती, सभ्यता आणि मूल्यव्यवस्था यांचीही विविधता सामोरे आणतात.

'व्यक्ती आणि वल्ली' या व्यक्तिचित्रणात्मक कथासंग्रहात पु.लं. नी एकूण वीस व्यक्ती आणि वल्लींची कथा सांगितली आहे. अतिशय नेमक्या, परिणामकारक आणि विनोदी अंगाने रंगलेल्या या व्यक्तींच्या जीवनाच्या कथा कथानकातून अभिव्यक्त झाल्याचे दिसून येते.

### ❖ 'व्यक्ती आणि वल्ली' मधील कथानक :

पु.ल. देशपांडे यांनी आपल्या जीवनप्रवासात भेटलेल्या व्यक्तींचे विविध नमूने आपल्या या व्यक्तिचित्रणसंग्रहात अतिशय कलात्मकतेने टिपले आहेत. पु.लं. नी साकारलेल्या या व्यक्तिरेखा मानवी जीवन व्यवहारात पदोपदी वास्तवात भेटणाऱ्या अशाच आहेत. या संग्राहतील "व्यक्ती आणि वल्ली" वर्षानुवर्षे मराठी साहित्यात आपले अस्तित्व टिकवून आहेत. पु.लं.नी या व्यक्तीसंग्रहातून साकारलेल्या निरनिराळया व्यक्तीरेखेविषयी गुंफलेले कथानक काहीसे थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येते.

**नारायण :**

मानवी समाजात विविध कार्य, सण-समारंभ मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. या कार्यात घरातील सर्वच मंडळी झोकून देवून काम करत असतात. परंतू असे असले तरी या कार्यात एखादी व्यक्ती अशी असते की जी त्या कार्याचा केंद्रबिंदू असते. त्या कार्यातील अथपासून इथपर्यंतची सर्व कामं तीच व्यक्ती पार पाडीत असते. अशीच नारायण ही व्यक्तीरेखा आहे. नारायण, नारुकाका, नारुभावजी, नाऱ्या, नारबा अशा विविध उपाध्यांनी संबोधली जाणारी ही व्यक्तीरेखा आपल्याला जीवनाच्या वाटेवर पदोपदी भेटते. अशा व्यक्तीरेखेचे महत्व विशद करताना पु.ल. देशपांडे अतिशय प्रभावी वर्णन करतात ते असे,

"नारायण, पानाचं तंबक कुठे आहे ? "
"नारायण, मंगळसूत्र येणार आहे नां वेळेवर? "
"नारायण, बँडवाले अजून नाही आले ? काय हो ?"
"नारायण गुलाबपाण्याची बाटली फुटली."
"नारुकाका, चड्डीची नाडी बांद नां ऽऽ"
"नारुभावजी, ही एवढी नथ ठेवून द्या तुमच्याजवळ रात्री वरातीच्या वेळी घेईन मी मागून."
"नाऱ्या लेका, वर चहा नाही आला अजून व्याही पेटलाय."
"नारबा, पटकन तीन टांगे सांगा."

अशा या व्यक्तीरेखेची ओळख 'हा आमचा नारायण ' ऐवढीच माफक करुन दिली जाते. नारायण ही काय वस्तू आहे हे मांडव उभा राहिल्याशिवाय कळू शकत नाही.

असे हे नारायण लोक दोन खिशांचा खाकी सदरा घालतात. या नारायणाची वेशभुषाच त्याचा परिस्थितीची जाणीव करुन देते. डोक्याला ब्राऊन टोपी असते. खाकी, ब्राऊन वगैरे मळखाऊ रंग नारायण लोकांना फार आवडतात. वहाण घेताना कशी होते हे सांगणे

मुश्कील असते. कारण तिचा अंगठा, वादी, पट्टी, होल सगळे काही बदलत बदलत कायापालट होत आलेला असतो. असा या नारायण क्वचित प्रसंगीच कोट घालतो. महत्वाच्या प्रसंगी नारायणाने केलेल्या कार्यामुळेच त्याची किंमत कळायला लागते. एखाद्या ठिकाणची सोयरिक जमली म्हणजे लग्न जमल्यापासून अक्षदा पडेपर्यंत सर्वच कामात नारायण महत्वाचा दुवा ठरतो. नारायणच्या विविध तऱ्हा पु.ल.नी विनोदी मनोभूमिकेतून व्यक्त केलेल्या आहेत.

### हरितात्या :

हरितात्या ग्रामीण जीवनातील एक महत्वपूर्ण व्यक्तीरेखा होय. प्रत्येक गोष्ट पुराव्यानिशी सिद्ध करुन दाखविण्याचा हरितात्यांचा स्वभाव अशी त्याची ओळख झाली होती. "अरे पुराव्यानं शाबीत करीन." हे वाक्य हरितात्याची आठवण करुन देत होते. आपले विचार,आपली तत्वे, नैतिक मूल्यांचा स्वीकार करुन जीवन जगणारे हरितात्या संस्कृती आणि परंपरांची जोपासना करत आपले आयुष्य घालवत होते. मांजरपाटाची पैरण, पंचा आणि डोक्याला मळकट टोपी असा काहीसा पोशाख परिधान करणारे हरितात्या संगळयांनाच जवळचे, घरातले आणि हक्काचे वाटायचे. जगण्यासाठी त्यांची सतत धडपड चाललेली असे. वेगवेगळे उद्योग-व्यवसाय करुन ते आपला चरितार्थ चालवित असत. पावसाळयाच्या दिवसात छत्र्या विकण्याचा व्यवसाय ते करत असे. मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून थोर पुरुषांच्या, संतांच्या, महात्म्यांच्या कथा हरितात्या मुलांना ऐकवत असत.

हरितात्यांना इतिहासाविषयी अपार प्रेम होते. इतिहासातील अनेक घटना-प्रसंग आणि व्यक्तीरेखांशी ते एकरुप झाले होते. त्यांचे इतिहासप्रेम पुढील वर्णनातून अतिशय नेमकपणाने स्पष्ट होते ते असे- "पण हरितात्या शिवाजीच्या पंक्तीला सहस्त्र वेळा जेवले होते. ते इतिहासाच्या पानात शिरले की त्यात संपूर्णपणे राहत. एकदा पुण्याला आम्ही कोणाच्या तरी मुंजीला की लग्नाला गेलो होतो. आठ दिवस सगळा पोरांचा तांडा घेऊन हरितात्या तिथल्या दगडा दगडाला कुणाचा पाय लागला ते सांगत होते. शनिवारवाड्याच्या त्या भकास ओसाडीत उभे राहून नारायणरावाच्या खुनाची कथा सांगताना ते "काका, मला वाचवा" अशा आरोळ्या मारीत धावत सुटले. शिवशाही, पेशवाईच्या पुढे हा माणूस मनाने कधी आलाच नाही." प्रस्तुत संवादातून हरितात्याचे इतिहास प्रेम आणि भोळाभाबडा स्वभाव पु.ल.नी अत्यंत मार्मिकपणे व विनोदी शैलीने चित्रित केला आहे.

### नामू परीट :

जातीनं परीट असणाऱ्या या नामूच्या स्वभावाचे विविध पैलू पहावयास मिळतात. निस्संग आणि निर्धास्त स्वभावाचा हा नामू सगळ्यांच्याच कुतहलाचा आणि कौतुकाचा विषय बनला होता. संत होण्याच्या वृत्तीचा हा माणूस परीट झाला कसा? हा प्रश्न प्रत्येकाला पडावा यात नवल नाही. दिग्दर्शक साहेबांच्या घरी नामू कपड्यांचा गठ्ठा् होऊन आला. अंगात झकास शर्ट होता. तो शर्ट पाहून दिग्दर्शक ओरडले, कारण तो शर्ट त्यांचा होता. त्यांच्या संतापाला अगदी सहजपणे उत्तर देत नामूने त्यांचा संताप सहजगतीने कमी केला. हा नामू म्हणजे प्रत्येकाला न उलघडणारे एक कोडेच होते. अशा कोडग्या स्वरुपाचा माणूस क्वचित पहावयास मिळतो. कपडे कधी एखाद्या ठरलेल्या वेळेत त्याने दिलेत असे कधीच झाले नाही. त्याला त्याचे कारण विचारले असता 'काल जरा जास्त झाली' असे न लाजता, न शरमता तो उत्तर देत असे. असा निर्भिड आणि निखळ वृत्तीच्या व्यक्तीरेखेचे चित्रण पु.ल. अतिशय नेमकेपणाने रेखाटतात ते असे- "चोरुन ऐकणे, कपडे चोरणे, दारु पिऊन "जास्ती होऊन पडणे", दिल्या शब्दाला न जागणे, वारंवार उसणे पैसे मागणे, ते परत न करणे, ह्यात काही किमान लाज बाळगावी लागते हे त्या इसमाच्या गावीच नाही. हा परीट कशानेच मळत नाही. सदैव स्वच्छ!" वरील आशयातून मानभाव गमावलेला नामू परीट पु.ल.नी उभा केला आहे.

परीट घराण्यातले सारे दोष एकवटलेला हा नामू गिऱ्हाईकांशी सरावलेला होता. चित्रपट आणि त्यातून साकारणाऱ्या विविध भूमिकांशी नामू एकरुप झालेला होता. या इंडस्ट्रीतली सारी मंडळी नामदेवपासून विभक्त झाली परंतू त्यांने इंडस्ट्री अजून सोडली नव्हती. बऱ्याच वर्षांनी बदललेल्या नामदेवाला पाहून तो आता एखाद्या प्रोड्यूसर-बिड्यूसर झाल्यासारखा वागू लागला होता. त्याच्या दारु पिण्याच्या सवईमुळे त्याला जेलमध्ये जावे लागले होते. त्यामुळेच तो जाडजूड झाला होता. त्याच्या वागण्या-बोलण्याचा कितीही विट आला त्याच्याविषयी कितीही राग निर्माण झाला तरी त्याच्याविषयीचे आकर्षण कमी होणारे नव्हते. हे अतिशय प्रभावीपणे वर्णन करतात ते असे, "त्या हरामखोरात हा काय असा गुण आहे हे कधीकाळी कळेल असे मला वाटत नाही. सदैव कपडयांच्या जगात वावरणारा इतका नागवा माणूस माझ्या पाहण्यात नाही! माझ्या पांढरपेशा परीटघडीच्या संस्काराला त्याचा रागही येतो आणि कुठेतरी हेवाही वाटतो. त्यातच माझे नामूविषयीचे आकर्षण दडले असावे." या वर्णनातून पु.ल.देशपांडे यांनी नामू परिट आणि त्याचे स्वभाव विशेष विनोदी शैलीतून मांडले आहेत.

### सखाराम गटणे:

सखाराम गटणे प्राज्ञ मराठी बोलणारा मराठी साहित्य आणि साहित्यिकांच्या प्रेमात आपले विश्व फुलवणारा एक ध्येयवेडा तरुण. विविध मराठी साहित्यिकांच्या साहित्याचा खोलवर अभ्यास करुन मराठी शब्दांवर प्रभूत्व प्राप्त केलेल्या गटणेची भेट लेखकांशी पावसाळयाच्या दिवसात रस्त्यात भिजलेले एखादे दिनवाणे कुत्रे उचलून आपण घरी आणावे तसाच या गटण्याच्या लेखकाशी योग आला. सखाराम गटणेच्या चेहऱ्यावर हवा गेलेल्या फुटबॉलचा भाव आहे. त्याचे प्रथम दर्शन झाले तेदेखिल त्याच भावात अर्ध्या विजारीत पांढरा सदरा खोचलेला,

नाकासमोर गांधीटोपी घातलेला, लहानसे भावशून्य डोळे, काळा रंग, वेडेवाकडे दात अशा थाटात हो दारात उभा असलेला मुलगा नजरेत भरण्यासारखाच होता.

हार-तुरे, घेऊन बाहेर आल्याबरोबर त्याने अत्यंत आदराने नमस्कार केला आणि स्वाक्षरीसाठी वही पुढे केली. 'मी स्वाक्षरी-बिक्षरी देत नाही.' असे म्हणताच त्याने 'जशी आपली इच्छा' म्हणत देवाला नमस्कार करावा तसा नमस्कार केला. त्याचा नमस्कार इतका प्रामाणिक होता की तो मनाला भिडला. संस्थेच्या चिटणीसांनी आणलेली वही पहात उभा असणाऱ्या मला खिडकीबाहेरील सखाराम गटणे अस्वस्थ करु लागला होता. असह्य होऊन शेवटी त्याला आत बोलवायला सांगितले. तसे तो येऊन उभा राहिला. नाव विचारताच 'सखाराम आप्पाजी गटणे' असे अगदी अदबीने त्याने नाव सांगितले. तेवढ्यात चिटणीसांनी त्याच्या अक्षराचं कौतुक करत त्याच्या कामाचा तपशीलही सांगून टाकला. त्याचे ते स्वाक्षरीचे पुस्तक अनेक साहित्यिकांच्या नावांनी आणि त्यांच्या साहित्यकृतीतील काही वाक्यांनी गजबजलेले होते.

'आपण मला स्वाक्षरी दिलीत तर मी आजन्म उपकृत होईन' असे वाक्य गटणेच्या तोंडून ऐकताना वाटले हा मुलगा विलक्षण छापील बोलतो, पण भाषेचा तो छापीलपणा खरा वाटतो. या घटनेपासून सखारामचे घरी येणे जाणे नित्याचे झाले होते. गटणे सणासुदीला येत गेला. संक्रातीची कार्डे, दिवाळीचे अभिष्टचिंतन, नववर्षाच्या शुभेच्छा वगैरे न चुकता पाठवित असे. तसेच अधूनमधून भेटतही असे. पुढे दोघातल्या वाढत्या स्नेहाने त्यांच्या घरातील इतंभूत घटना, प्रसंग आता परिचयाचे होऊ लागले होते. एक दिवस असा आला. नकळत माझे पाय त्याच्या घराकडे ओढावले. त्याच्या घरची ती सद्यस्थिती पाहून बेचैन झालेल्या लेखकांनी सख्याच्या जीवनप्रवाहाचे वर्णन अतिशय बोलक्या शब्दात केले आहे हे असे "सख्याच्या लग्नात मी माझी सर्व पुस्तके त्याला भेट म्हणून दिली. प्रत्येक पुस्तकावर नवा संदेश लिहून दिला होता. साहित्याशी एकनिष्ठ राहा आणि जीवनाशीही!" प्रस्तूत वर्णनातून पु.ल.नी साहित्याचा रसिक असलेल्या सखाराम गटणे याचे भाव विश्व साकार केले आहे.

माझ्या हाताने जीवन हा शब्द त्यानंतर लिहिला नाही. संख्या जीवनाशी एकनिष्ठ राहु लागल्याचे वर्षभरातच मला कळले. सख्याचे वडील स्वत: चांदीच्या वाटीतून नातवाचे पेढे घेऊन आले. काही वर्षापुर्वी सख्याने प्राज्ञचे पेढे दिले होते. त्याच्या बापाने नातवाचे दिले.

"सखाराम गटणे मार्गाला लागला. त्याच्या जीवनातला साहित्याचा बोळा निघाला पाणी वाहते झाले."

**नंदा प्रधान :**

नंदा प्रधान हे नाव आम्ही गॅरी कपूर, फ्रेडरीक मार्च, डिक पॉवेल, रोमन नव्हॅरो यांच्या नामावलीत घेत होतो. दिवाळीच्या नाताळाच्या सुट्टीत खोलीवर राहणारा नंदा प्रधान, नाटकातून काम करणारा नंदा प्रधान आजही माझ्या लक्षात आहे. जवळ-जवळ वीस वर्षांनी भेटलो. आजही तो तसाच. जवळ-जवळ पावणेसहा फूट उंच, सडपातळ, निळया डोळयांचा, लहानशा पातळ ओठांचा, कुरळया केसांचा नंदा रुबाबदार दिसतो. महाविद्यालयात तो ईंग्लिश बोलणाऱ्या कॉस्मॉपॉलिटन गटात असायचा. एके दिवशी तो माझ्याकडे आला आणि म्हणाला, 'आपल्याला जायचं आहे', 'कुठे', 'इंदू वेलणकरकडे चल' त्याला ज्याप्रमाणे काहीही शोभून दिसे तसा तो आवाजही शोभे.

इंदू वेलणकरचे अभिनंदन करायला म्हणून आम्ही तिच्या घराकडे निघालो. बोल संपता संपता ज.गो. वेलणकर, रि.ए. एन्स्पेक्टर, अशी पाटी दिसली. आम्ही आत गेलो. एका अत्यंत अखूड चेहऱ्याच्या पेन्शनरने विचारले, 'काय हवय? ' 'इंदूताई वेलणकर इथेच राहतात ना?' मी चटकन ताई जोडून आमचे शुद्ध हेतू जाहीर केले. तेवढ्यात इंदूने डोकावून नंदाला पाहिले. त्याला पाहून ती थक्क झाली. पाचवारी पातळ नेसलेली इंदू, सुंदर दिसत होती, 'बसा, बसा ना आपण' इंदू नंदाकडे पाहत मला सांगत होती. ती इतकी घाबरली होती. नंदा शांतपणे बसून तिला म्हणाला, 'हार्टिएस्ट कॉग्रॅच्युलेशन्स' 'थँ.... क्यू .... ' सुकलेल्या थरथरत्या ओठांनी ती म्हणाली, नंदाला तिच्या यशाबद्दल जेवायला येण्याचे दिलेले आमंत्रण तिने स्वीकारले व आम्ही एका हॉटेलात जेवण्यास गेलो. इंदू वेलणकरही तिथे आली होती. त्या हॉटेलात पाश्चात्य संगीताचे सूर येत होते. पलीकडच्या टेबलावरुन व्हिस्कीचा वास येत होता. अशा वातावरणात आम्ही एकमेकांच्या समोर बसलो होतो. बऱ्याच विषयांवर बोलत बोलत वेळ निघून गेला.

पुढे बऱ्याच वर्षांनी नंदा भेटला. त्याने दिलेल्या ओळखीपासून मला आश्चर्य वाटले. 'पाहतोस काय?' त्याच्या या उद्‌गारानी मी भानावर आलो. त्याच्या रुबाबदार व्यक्तीमत्वाकडे पाहत त्याला विचारले, 'केव्हा आलास हिंदूस्थानात?' 'केव्हाच' असे म्हणत तो 'चल' म्हणाला आणि त्याच्या इंग्लंडमधील वास्तव्याबाबत बोलत आम्ही चालते झालो. त्याने मलाही विचारले, 'कुठे असतोस नोकरीला?' मी माझ या ऑफिसचा पत्ता सांगितला. त्याने टेलीफोन नंबर लिहून घेतला आणि पुढे त्याचे मला फोन येऊन लागले. 'संध्याकाळी येतो. गाडी घेऊन गेटपाशी उभा रहा' ऐवढेच सांगत असे. आम्ही असेच वारंवार भेटत गेलो आणि पूर्वी कधीच दिसला नव्हता तो नंदा मला दिसायला लागला.

एकदा आम्ही ब्रांद्रा पॉईंटवर बसलो होतो. नंदाला ही जागा फार आवडायची. या जागेबरोबर त्याच्या बालपणातील अनेक आठवणी जोडल्या गेलेल्या होत्या. आपल्या भूतकाळातील आठवणीत रमत रमत नंदा मला त्या टेकडीवर घेऊन गेला आणि आपला सारा भूतकाळ त्याने माझ्यापाशी विशद केला. अतिशय वैभवात वाढलेला हा नंदा एक विलक्षण व्यक्तिमत्व घेऊन वावरत होता.

नंदाला मी लग्नाच्या संदर्भाने विचारपूस करता विल्मा नावाच्या जर्मन मुलीशी विवाह केल्याचे सांगितले. परंतू पुढे झालेल्या युद्धामुळे त्यांच्या विवाहात विघ्न निर्माण केले. एक प्रश्न सतत माझ्या मनाला भेडसावत होता. नंदा इतका वेळा माझ्यासोबत का घालवतोय? एके दिवशी इंदू वेलणकरचा विषय निघाला आणि नंदा अतिशय भावनिक झाला आणि नंदाने त्याला दिलेले पत्र पाहून त्याच्या हाती देत त्याला म्हटले, 'नंदा जगात देव नाही आहे रे!' यावर नंदाने दिलेली प्रतिक्रिया अतिशय बोलकी आहे. तो म्हणतो, 'आरे जगात काहीच नाही! ज्या क्षणाला आपण श्वास घेत असतो ना, तेवढा क्षण असतो. ते बघ' खिडकीबाहेरचा समुद्र दाखवित मला तो म्हणाला, "तो समुद्र आहे ना?

त्याला आपल्याला काय दिसतं? लाटा दिसतात त्या बोटी दिसतात. ते कोळी, ती बघ लहान होडी घेऊन निघाले आहेत. त्यांना काय दिसतं? फक्त मासे दिसतात. ते आणि मासे - त्यांच्यात येणारी अडचण म्हणजे समुद्र! जीवन जीवन ज्याला म्हणतात ना ते आपल्या जन्मापासून मरणापर्यंत नुसतं असं आड येत असतं. बाकी काही नसतं ! कधी प्रचंड लाटा होऊन येतं. वादळ होऊन येतं. कधी उगीचच मठ्ठपणाने आडवं पडून राहतं. मग कंटाळा येऊ नये म्हणून आपण त्याला लेबल लावतो- प्रेम म्हणतो, बायको म्हणतो, आई म्हणतो, धर्म म्हणतो, देव म्हणतो - काय वाटेल ते म्हणतो. एरवी जीवन म्हणजे एक निरर्थक फसवी अशी वस्तू आहे. ह्या समुद्रासारखी" त्याच्या या म्हणण्याला त्याचा जीवनाविषयीचा दृष्टीकोन लक्षात आला. पु.ल.देशपांडे यांनी नंदा प्रधान यांच्या व्यक्तिमत्वातून जीवन विषयक तत्वज्ञान अत्यंत मार्मिक आणि वैचारीक भूमिकतून व्यक्त केले आहे. साहित्याच्या क्षेत्रात अनेक साहित्यक विचारवंतांनी जीवन या संकल्पनेचा शोध घ्यावयाचा प्रयत्न केला आहे. पु.ल.नी आपल्या विनोदी शैलीद्वारे अनेक गंभीर व्यक्तिरेखांच्या माध्यमातून जीवनाचे मर्म शोधण्याचा यशस्वी प्रयत्न करुन जीवनाचे सार मांडले आहे.

**बोलट :**

जनार्दन नारो शिंगणापूरकर ह्या नावाने कोणालाही कसल्याही प्रकारचा बोध होणार नाही हे नाव उच्चारताच एखादा संशोधक, इतिहासकार वाटावा असाच आहे. जनूचा बाप त्याला फक्त आपल्या नावाची 'नारो' ही दोन अक्षरे देऊन गेल्यामुळे हा घोटाळा होणे साहजिकच आहे. 'जनार्दन नारो शिंगणापूरकर' हे एखाद्या इनामदाराला शोभून दिसणारे नाव आहे. अशा या जनूचे आयुष्य नाटकांतील भूमिका साकारत वास्तव जीवनाची पार्श्वभूमी साकारु लागली. इतिहासातील अनेक व्यक्तिमत्वांची रुपे साकारणारा 'जनार्धन नारो' हा मूळ पुरुष शोभून दिसला असता. परंतू जनूला जगापुढे पुरुष म्हणून जगता आले नाही. जनूच्या कुंडलीत लग्नाचे योगच नव्हते. जनूच्या आयुष्याला मिळालेली ही उपाधी कशी बहाल झाली. हे सांगताना लेखक वर्णन करतात, "जुनं बोलट होता. नाटक कंपनीत ज्याच्या नावाची जाहिरात होते तो नट, आणि बाकीचे बोलट अशी एक विष्णूदास भाव्यांच्या काळापासून चालत आलेली कोटी आहे. ह्या दरिद्री कोटीचा जनक कोण होता कोण जाणे परंतू जनू हा त्या कोटीचा बळी होता." या वर्णनातून पु.ल. नी नाटय वेडया माणसांची दुर्देवी कर्म कथा व्यक्त केली आहे.

नाटयकलेची तळमळ असणारा हा नाट्यकलावंत पुढे नाटक मंडळीत दाखल झाला. त्याकाळी कंपन्यातून दोन वेळा फुकट आणि भरपूर जेवायला मिळत असे, त्यामुळे अनेक लोक नाटक मंडळीत दाखल होत असत. महिन्यावर महिने लोटले आणि जनू नाटक कंपनीत रुळला. एक पत्र्याची पेटी, त्यात काही कपडे, एक थेटरात सापडलेला रेशमी रुमाल आणि मोडका कंगवा, ॲल्युमिनीयमचा चंबू, फाटक्या तरटावर धडके तरट टाकून केलेला बिछाना असा त्याचा संसारही सजला. जनूला पुढे दीडचा चार रु. पगार व्हायला चार वर्षे लागली. परंतु जनू काळाबरोबर बदलू लागला होता. पुढे आणखी काही वर्षे निघून गेल्यानंतर जनूने विडी-काडी बरोबर इतरही बारीक-सारीक व्यसनांची जोड केली. जनूने पुढे स्वतःची नाटक कंपनी सुरु केली. जनू वेगवेगळया भूमिका साकारित मोठा कलावंत झाला. त्याच्या आयुष्याला एक वेगळी दिशा मिळाली. सगळयांच्याच आवडीचा झालेला जनू आता जिवंत नाही. एक कारकून, एक कम्पाऊंडर, एक मराठी शाळा मास्तर आणि दोन हौशी इसम यांच्या उपस्थितीत जनार्दन नारो शिंगणापूरकर या नटश्रेष्टींचा आत्मा आनंतात विलीन झाला.

**भैय्या नागपूरकर :**

'भैय्या नागपूरकर' हा आमच्या कॉलेजमध्ये नबाब म्हणून ओळखला जात असे. तसा तो काही मोठा बांधेसूद नव्हता पण शेरखानी, सुरवार निते चढाव वगैरे चढवले की खरोखरच नबाब दिसत असे. अगदी लाहोर-लखनो खाक्या मोठा दिलदार प्राणी, पण सर्वसाधारण कोणालाही विचारले असते तर 'तो भैय्या ना? एक नंबरचा मवाली!' असेच मत ऐकायला मिळाले असते. भैय्याशी ओळख झाल्याचा प्रसंग आजही आठवतो. मी चहा घेऊन काफे किस्मत मधून बाहेर येत होतो. सायकलचे कुलूप काढता काढता मी गुणगुणलो, "ओ, पिलानेवाले नजर से नजर मिलाके पिलाओ" वाहवा! वाहवा! मागून आवाज आला. "दोबारा दोबारा होने दो. पुन्हा म्हणा ना प्लीज. या या बसा इकडे! इथून आमच्या ओळखीला सुरुवात झाली." प्रस्तूत संवादातून भैय्या नागपूरकर या व्यक्तिरेखेशी पु.ल. ची ओळख कशी झाली आहे ते स्पष्ट होते.

भैय्याने गाणे खुप ऐकले होते, नि तो स्वतः सारंगीही चांगली वाजवायचा. त्याचे राहणीमान पाहून कोणीही त्याला मुस्लिम समजत असे. परंतु वास्तवात मात्र तो शुद्ध देशस्थ यजुर्वेदी ब्राम्हण आहे. भैय्या निखळ आणि शुद्ध मनोवृत्तीचा असूनही लोक त्याच्यावर आरोप-प्रत्यारोप करायचे. लोकांचे भैय्याविषयी बनलेले मत कसे अजब होते हे लेखक अतिशय भावस्पर्शी शब्दात वर्णन करतात ते असे, "भैय्याच्या बाबतीत दुनिया अजीब खरीच, लहानपणी आईबाप वारले. आलोट संपत्तीचा एकटा वारस. कोर्टाने सांभाळायाला दायी ठेवलेली. मॅट्रीक होऊन कॉलेजमध्ये येण्यापूर्वीच सज्ञान झाला ना इष्टेट ताब्यात आली. मोठा बुद्धीमान यात शंका नाही. कॉलेजच्या परिक्षा लवकर पास होत गेला. वर्षभर गाणे बजावणे, दारु, रेसिस यात वेळ जायचा. एखादा महिना अभ्यास व्हायचा त्याचा. त्याला दारुबद्दल मी खूपच सांगत असे. पण त्याचे तत्वज्ञान निराळे होते. "अरे, दारु पिणे म्हणजे दारुड्या बनणं नव्हे. गडकरींचे ना तो 'एकच प्याला' लिखनेवाला? एकच प्याला हे झूट आहे साफ. मी सांगतो ना तुला, गेल्या सत्याग्रहाच्या चळवळीत गांधीने उपास केला होता. कशाबद्दल तरी काहीतरी हरिजन-बिरिजन होतं. तुला सांगतो, एकविस दिवस दारुला शिवलो नाही! माणसानं षोक केलाच पाहिजे. दुसऱ्याला त्रास देऊन षोक करु नये हे पटतं आपल्याला. गरीब-गुरिबांना मदत करावी." यातून लेखकांनी भैय्याची स्वच्छंद मनोवृत्ती व्यक्त केली आहे.

**नाथा कामत :**

'नाथा कामत' हे असं समीकरण होतं की, ते कोणालाही कधीही उलघडणारं नव्हतं. माझ्या आयुष्यात आलेल्या या नाथा कामताविषयी माझ्या मनात काय भावना आहेत याचा अजून मलाच नीट उलगडा झालेला नाही आणि या जन्मात होणार नाही. त्याच्या काही सवयी कोणालाही खटकाव्यात अशाच आहेत. कोणताही खाण्याचा पदार्थ निरखून पहात खाणे ही त्याची सवय खूप वाईट होती. आम्ही दोघं एकत्र असलो तरी त्याचं जग निराळं आणि माझं जग निराळं. नाथा कामत हा भलताच स्त्रीवेडा होता. कुठल्याही शहर वस्तीतल्या रस्त्यातून त्याच्याबरोबर चालण्यापेक्षा भर दुपारी अनवाणी धावत जाणे अधिक चांगले. एवढ्या सखोलतेने तो रस्त्याने येणाऱ्या-जाणाऱ्या महिलांकडे पाहत असे. अशा या नाथाची आणि माझी मैत्री ही एखाद्याला आपोआप सर्दी व्हावी तशी झाली.

नाथा आणि गणपती हे दोघे भाऊ. गणपती मॅट्रीक झाल्यावर पोस्टात चिटकला आणि तिथच टिकून राहिला तर त्याच्या उलट नाथाच्या शेकडो नोकऱ्या झाल्या. त्याने नोकऱ्या अधिक केल्या की प्रेम हे सांगणे बिकट आहे. नाथा नेहमी मला काहींना काही तरी सांगायचा. त्याच्या आयुष्याची ही काहाणी ऐकून नाथा कामत हा स्वत:विषयीच्या हजारो गैरसमाजांचा दोन पाय फुटलेला होल्डॉल आहे. नाथाच्या या व्यक्तिमत्वाविषयीचे वर्णन लेखक अतिशय नेमक्या शब्दात करतात ते असे- "एक गोष्ट मात्र मान्य केली पाहिजे. प्रेम ह्या विषयात नाथाची मराठी-संस्कृत- फार्शी - उर्दु ह्या सर्वांगाने तयारी आहे. अर्बुज सुलतानपुरी, सुराख चमनपुरी, उन्स उस्मानबादी वगैरे अपसत्य लिपित लिहीणारे कवी त्याच्या जिभेवर हाजिर असतात. किंबहुना, ह्या यवनांनीच त्याच्या प्रेमभंगाच्या सगळया तसबिरींना, महिरपीसारख्या उर्दू ओळींच्या चौकटी पुरविल्या आहेत." पु.ल.नी नाथांच्या नाना करामती विविध शैलीतून कशा व्यक्त केल्या आहेत याचा प्रत्यय येतो.

नाथा आता चाळीसीत गेला होता. आजही तो कॉलेज उघडण्याच्या वेळी, जुन्या बायका आष्टसिद्धी विनायकाचे व्रत करुन पालीचा, पुळयाचा सगळे गणपती करुन येतात तसा जून एकवीस ते तीसच्या आठवडयात नाथा विल्सन ते रुइया चकरा मारुन 'सीजन कसा काय आहे? ' ते पाहून येतो. माणूस कितीही मोठा झाला तरी त्याच्या अंगभूत सवयी बदलत नसतात हे नाथाच्या स्वभाववृत्तीवरुन पहावयास मिळते.

**दोन वस्ताद :**

पु.ल.देशपांडे 'व्यक्ती आणि वल्ली' या व्यक्तिचित्रणातून अनेकविध मनोवृत्तीच्या मानवी जीवनाचा शोध विनोदी भूमिकेतून करताना दिसतात. तसेच मानवी जीवन मुल्याचे व आत्मिक जाणीवेचे विवेचन अत्यंत तार्किकतेतेने करतात. साठी उलटून गेलेला टिल्या वस्ताद तबलजी पुढ्यात ढोलके घेऊन रियाज करीत बसला होता. तबल्याच्या कायद्यांत तास तास सहज घुमणारा हा वस्ताद आजही ढोलकीवर बकरीकी एक टांग वाजवीत बसलेला. आश्चर्य वाटले. विचारपूस करता वस्तादांनी सांगितले काय करता साहेब? कंपनीच्या नव्या मुजिक डायरेक्टरनं हे 'हिजड्याचं वाघ' बांधलंय म्हातारपणी आमच्या गळयात. एवढे आपुलकीने आणि आदबीने वागणारे वस्ताद मनापासून बोलायला लागले की, एकेरीवर येत आणि आपल्या जीवनप्रवासाच्या वेगवेगळया कथा सांगत. त्यांच्या कथा 'मोपे डार' पासून सुरु व्हायच्या आणि हातातील विडीचा शेवटचा झुरका मारुन कथेच्या मंगलचरणास सुरुवात व्हायची आणि वास्तव परिस्थितीतील संगीताच्या आवस्थेवर ऐकून थांबायची. अशा या कलावंताच्या आयुष्याचे समर्पक चित्र रेखाटताना लेखक अतिशय हृदयस्पर्शी वर्णन करतात. ते असे- "आज स्वस्थ धान्यासमोर बारीक ते उभे असोत किंवा दुपारच्या खाण्याचा ॲल्युमिनीअमचा डबा घेऊन केरवा वाजविण्यासाठी स्टुडिओची तीन मैल लांबीची वाट चालत असोत. तीच ताठ मान, ती नबाबाने दिलेल्या काळया पडलेल्या चांदीची मूठ असलेली काठी आणि डोक्यात अमील बक्षाल 'खाल्या' ची आठवण घेऊन त्या गुंगीत टिल्या वस्तादाची चार फुट, चार इंच उंचीची(?) मुर्ती चालताना पाहिले की वाटते, हा जीवंत माणूस नाही, हा एक कलावंताच्या क्षणाच्या बहादुरीचा चालताबोलता विजयध्वज आहे."[३६] पु.ल. नी माणसाच्या अंतर्बाह्य व्यक्ति जीवनातील बारकावे अत्यंत सूचकपणे टिपले आहेत. याचा प्रत्यय येतो. त्याचबरोबर त्यांची व्यक्तिचित्रणे विनोदी शैलीमुळे काळाच्या ओघात कशी अमर ठरलेली आहेत. हे त्यांच्या लेखनशैलीचे वैशिष्टये असल्याचे नाकारता येत नाही.

**गजा खोत :**

पु.ल. नी वेगवेगळया स्वभावाच्य व मनोवृत्तीच्या माणसाचा शोध घेतला आहे. त्याचा प्रत्यय या व्यक्तिरेखेद्वारे घेता येतो. आर्धी विजार, कोट, शर्टाचे वरचे बटनदेखील नीट लावलेले, डोक्यावर नवी कोरी जराशी मोठी होणारी टोपी- मागल्या बाजूने करंगळी सहज आत जाऊ शकेल ऐवढी जागा सोडलेली, गळयाला कापडी दप्तर लटकतेय अशा थाटात वर्गात नवीन आलेला हा मुलगा माझ्या जवळ येऊन 'माझं नाव गजा खोत' अशी ओळख करुन दिलेला मला अजून आठवतो. गजा खोत त्या दिवशी जो शेजारी बसला तो पुढे आठ वर्षे शेजारीच होता. बी.ए. झाल्यावर तो मिलीटरी अकौंटसमध्ये चिकटला तो अजून तिथेच आहे. आमचे रस्ते बदलले ते तिथे माझ्या सावलीसारखा हा अनेक वर्षे माझ्याबरोबर राहीला. अभ्यासात हुशार असणारा हा गजा खोत संयमी आणि धैर्यशील वृत्तीचा होता. शाळेत चळवळीच्या दिवसात हरताळा पडले, की आमच्याबरोबर दप्तर घेऊन गजा बाहेर पडायचा आणि दुसऱ्या दिवशी आमच्याबरोबर हेडमास्तरांच्या छड्या खायचा.

कॉलेजमध्येही गजा आमच्यासोबतच असे. निरगुण आणि निराकार वृत्तीच्या या गजाला आम्ही पुढेपुढे राबवायला लागलो सिनेमाची तिकीटे काढून आणणे, सिगारेटी आणायला पिटाळणे अशी कामे त्याच्याकडून करवून घेऊ लागलो. माझ्यासारखेच गजाही इंग्रजी वर्तमानपत्राचे वाचन करी पण त्याचे हे सारे व्यवस्थितपणाचे होते. असा हा निर्गुण, निराकार माणूस लहान मुलांत विलक्षण लोकप्रिय होता. आमच्या वाड्यात लहान मुले नेहमी त्याचे स्वागत करीत असत. असा हा गजा पुढे दिवसेंदिवस बदलत गेला. सिगारेटी ओढायला शिकला. आमच्या बरोबरीनेच

तो प्रत्येक गोष्ट करु लागला. एक एक करता कॉलेजातली वर्षे भराभर उडून गेली. रोज एकमेकांशिवाय चैन न पडणारी आम्ही समानशील आणि व्यसनी मित्रांची टोळी दाही दिशांनी पांगली.

पुढे काही दिवस उलटून गेल्यानंतर गजा सहकुटूंब माझ्या घरी आला. संसारात रमलेल्या गजाला पुढे एक मुलगाही झाला. शाळेपासून नोकरीपर्यंतचा गजाच्या जीवनाचा प्रवास पाहिलेला मी मनाशीच म्हणत होतो. "ह्या गजाच्या जीवनात ते दिवस आले तरी होते कधी." पु.ल.नी प्रस्तुत संवादातून महाविद्यालयीन जीवनात दिशा देणाऱ्या तरुणाची शोकांतिका व्यक्त केली आहे.

### अण्णा वडगावकर :

वडगावकर आमचे संस्कृतचे प्रोफेसर. ते वर्गात शिकवायला लागला की, हसून हसून मुलांच्या मुरकुंड्या वळत होत्या. बाहेरुन ऐकणाराला वाटले असते की प्रोफेसर वडगावकर वर्गात झेंडूची फुले वाचताहेत. सांगितले तर कोणाला खरे वाटायचे नाही. कवीकुलगुरु कालिदासाच्या अत्यंत करुण अशा आजविलापाचे वाचन चालले होते. ठेंगणी मुर्ती, लांब पिवळा पार्शी फॅशनचा कोट डोक्यावर पगडी त्यांना पाहिले की, लहाणपणी माझी मराठी तिसरींची परिक्षा घेतलेल्या दिपोटीची आठवण व्हायची. अशा या वडगावकरांना संस्कृतविषयी तळमळ होती. प्रत्यक्षात वर्गात शिकवितांना सुरुवात इंग्रजींने व्हायची. मध्येच कुठतरी गाडी मराठीवर यायची तर गुजराती मुले वर्गात शिकतात याची जाणीव झाल्यावर इंग्रजी भाषेवर यायची. मुलांशी एकरुप झालेले प्रोफेसर पुष्कळ वेळा मुलांना आपल्या घरीही घेऊन जायचे.

### परोपकारी गंपू :

पु.ल.ची ही व्यक्तिरेखा विशेष लोकप्रिय झाल्याचे सांगता येते. या व्यक्तिरेखेद्वारे पु.ल.नी कॉमन मॅन त्त्या जगण्याची रित प्रभावीपणे साकार केले आहे. गंपू जन्माला आला तो हितचिंतक म्हणूनच. मला खात्री आहे की, जन्माला येणारा प्रत्येक जीवन भोकांड पसरुन येतो. पण गंपूने जन्मल्याबरोबर आईला नसेल तरी सुईणीला तरी नक्की विचारले असेल. गंपू जन्माला आला तोच उपकारपुरता आला. इतका उपकारी पुरुष यापुर्वी भूतलावर नांदला असेल की नाही देव जाणे. गंपूच्या परोपकारी धोरण वृत्तीचे चित्रण लेखक नेमकेपणाने रेखाटतात ते असे- "गंपू कपडे शिवून शिवून घालतो तो केवळ बाबूराव शिंप्याच्या धंदा चालावा म्हणून, जेवतो ते किराणा भुसार दुकानदारांवर उपकार म्हणून, सरकारी कचेरीत नोकरी करतो पंचवार्षिक योजना यशस्वी व्हावी म्हणून, शाळा कॉलेजात देखील मास्तरा-प्रोफेसरांची चूल पेटावी म्हणून गंपूने इतरांपेक्षा चांगला भक्कम तळ दिला होता आणि शेवटी लग्न केले तेदेखील सासऱ्याचा एकनवमांश भार उतरावा म्हणून" लहानपणापासून सोबत असणाऱ्या या गंपूला 'परोपकार' हा बालपणापासून मुरलेला. पुस्तकांना कव्हरे घालणे, मंडई करणे, प्रेक्षणीय स्थळांची ट्रीप, चहा-कॉफीची व्यवस्था अशी कामे गंपूच करायचा. डोळे, तुकतुकीत कांती, त्याहुनही तुकतुकीत आणि वयाच्या एकोणीसाव्या-विसाव्या वर्षी पडलेले टक्कल, खाकी फुलपँट आणि हाफ शर्ट घातलेला आणि सायकलीला किमानपक्षी तऱ्हेतऱ्हेच्या अर्धाएक डझन पिशव्या लटकवलेल्या हे त्याचे ठराविक ध्यान!

असा हा परोपकारी असणाऱ्या गंपूच्या वडिलांनी आणि मातोश्रीने तर आपल्या या एकुलत्या एक चिरंजीवापुढे केव्हाच हात टेकले आहेत. विविध घटना प्रसंगांनी गजबजलेल्या आयुष्यात गंपूच्या जीवनात गंपू मॅट्रीकची परिक्षा पास होणे हे कोणालाही न सुटलेले कोडे होते. पुराणात जसा काही देवांना चिरतारुण्याचा वर आहे, तसा गंपूला चिरप्रसन्नतेचा वर आहे. गंपूला एकूणच महागाई भत्त्यासकट सव्वाशेच्या पलीकडे मासिक आमदानी नसलेल्या गंपूला ही प्रसन्नता टिकविता येते कशी? याचे आम्हाला आजन्म कुतूहल आहे.

### चितळे मास्तर :

पु.ल.नी मानवी मनाची नस पकडून विनोदी शैलीतून मानवी स्वभावाविषयी भाष्य केले आहे. त्यामध्ये हे व्यक्तिचित्रण महत्वाचे आहे. आमच्या गावात पोराला एकदा बिगरीत नेऊन घालते की, ते पोर मॅट्रीक पास किंवा नापास होईपर्यंत आई-बापांच्या जीवाल घोर नसे. कार्टे चितळे मास्तरांच्या हवाली केलं म्हणून ते सुखरुप राहायचे. या शाळेचे नामकरणच 'चितळे मास्तरांची शाळा' असे झाले होते. चितळे मास्तरांचे शाळेशी एकरुपत्व सिद्ध झाले होते. अशा या चितळे मास्तरांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन लेखक अतिशय नेमक्या शब्दांत करतात ते असे- "डाव्या हातात धोतर, एके काळी निळया रंगाचा असावा अशी शंका उत्पन्न करणारा खादीचा डगला, डोक्याला ईशान्य-नैऋत्य दाखवीणारी काळी टोपी, टोपीबाहेर टकलाच्या आसपास टिकून राहिलेले केस आले आहेत, नाक आणि मिश्यांची ठेवण राम गणेश गडकऱ्यांसारखी, पायातल्या वहाणा आदल्या दिवशी शाळेत विसरुन गेले नसतील तर पायात आहेत. डावा हात धोतराचा सोगा पकडण्यात गुंतलेला असल्यामुळे उजव्या हातातली पुस्तके उजव्या खांद्यावर धरलेली आणि हातात पुस्तके नसल्यास उजव्या हाताची तर्जनी खांद्याच्या बाजूला आपण एक हा आकडा दाखवताना नाचवतो तशी नाचवित. चितळे मास्तरांनी स्वतःच्या घरापासून शाळेपर्यंतचा तो लांबसडक रस्ता गेली तीस वर्षे तुडवला." शिक्षणक्षेत्रातील आदर्श शिक्षकाचे गुणविशेष विनोदी अंगानी व्यक्त केले आहेत.

चितळे मास्तरांनी मला शिकवले, माझ्या काकांना शिकवले आणि आता माझ्या पुतण्यांना शिकवताहेत. इंग्रजी पहिलीत आल्यापासून मॅट्रिकपर्यंत सात वर्षे चितळे मास्तरांनी मला अनेक विषय शिकविले. त्यांचा मुख्य विषय इंग्रजी, पण ड्रॉईंग आणि ड्रील सोडून ते कुठलाही विषय ते शिकवित असत. सर्वगुणसंपन्न असणाऱ्या चितळे मास्तरांनी मात्र आपल्या तीस-बत्तीस वर्षाच्या कारकिर्दीत छडी कधीच वापरली नसावी. त्यांच्या जीभेचे वळणच इतके तिरके होते की, तो मार पुष्कळ होई. चितळे मास्तरांनी आपल्या साऱ्या आयुष्यात कुणालाही शिस्त

नावाची गोष्ट लावायचा प्रयत्न केला नाही. त्यांनी त्यांच्यापुढे आलेल्या सर्वांच्यावर फक्त प्रेम केले. प्रेमळ शब्द न वापरता प्रेम केले. चितळे मास्तरांच्या जोडीचे शिक्षक त्यांची खूप थट्टा करीत असावे. हे आम्हाला सहलीच्या वेळी लक्षात येई.

चितळे मास्तर आम्हाला घरी बोलावून घेऊन आमचा स्पेशल क्लास घ्यायचे. पहाटेच्या त्या अंधूक प्रकाशात चितळे मास्तरांच्या ओसरीवर कंदिलाच्या प्रकाशात चाललेला तो स्पेशल क्लास अजूनही माझ्या स्वप्नात येतो. पुढे आमची मॅट्रीक झाली आणि चितळे मास्तरांच्या आणि असंख्य मुलांच्या वाटा वेगळया झाल्या. मग अनेक वर्षात त्यांच्या गाठी पडत नाहीत. पण नित्याच्या व्यवहारात देखील त्यांची आठवण राहिली आहे.

**लखू रिसबूड :**

विविध मनोवृत्तीच्या माणसाचे व्यक्तिचित्रण या संग्रहातून साकारताना लखु रिसबूड हे व्यक्तिचित्र महत्वाचे वाटते. कारण या व्यक्तिरेखेद्वारे पु.ल.नी बुध्दिजीवी, मनोवृत्ती, स्वभावविशेष विनोदीवृत्तीने साकार केले आहेत.

"आमच्यासारखे बुद्धिजीवी लोकांना",

"आम्हा बुध्दिजीवी लोकांचं जीवन",

"आजच्या आमच्या बुध्दिजीवी वर्गाला" असे काहीसे नेहमी म्हणणारा लखू बुध्दिजीवी आहे. म्हणजे उपसंपादक आहे. वास्तविक 'बुध्दिजीवी आहे' म्हणजे काय आहे याचा त्यालाही नीटसा अंदाज नाही. लखू 'दैनिक आघाडी', 'मासिक जडभारत', आणि 'साप्ताहिक लोकरंजन' अशी तीन नियतकालिके काढणाऱ्या प्रकाशन संस्थेमध्ये नव्वद रुपये पगारावर नोकरीला आहे. दोन वर्षापुर्वी तो एम.ए. झाला त्याच्या मनात अर्थशास्त्र घ्यायचे होते. परंतू इंग्रजी चांगले नसल्याचे गुपीत रघूलाच माहित होते. लखू इंटमध्ये पास क्लासात आला. त्याच्या सोबत्याची कल्पना तो फर्स्ट क्लासात येईल अशी होती. बुद्धीजिवी वर्गाची निशाणी असणारा चष्मा लखूला इंटर पास झाला त्याच वर्षी लागला. ह्याचा त्याला मनातून आनंद झाला.

कॉलेजच्या या सात वर्षाच्या काळात कोणत्याही खेळात त्याने प्रत्यक्ष कधीही भाग घेतला नाही. बी. ए. शिकत असताना त्याचे कैक मित्र-मैत्रिणी झाले होते. त्याच्या जवळचा असणारा मित्र मधू गुप्ते यांचे एकमत झाल्यामुळे परस्परांच्या बुद्धीमतेबद्दलचा त्याचा आदर वाढला. ह्याच सुमारास मधू गुप्ते परळ भागात पार्टीच्या कामाला लागला होता. लखूही वाङ्मयाशी आता चांगल्या परिचयाचा झाला होता. वाङ्मयासंबंधी आपण बोलू शकतो. याचा त्याला आत्मविश्वास वाटू लागला होता. असे बी. एस. करत करत लखूने एम.ए. ही केले. साहित्यिक मित्रांच्या साह्याने तो 'लोकरंजन' साप्ताहिकांच्या कचेरीत उमेदवारी करु लागला. पुढे हळू हळू त्याची लेखणी चौफेर चालू लागली. तेवढ्यात लोकरंजनातल्या एका उपसंपादकांने विमा कंपनीत नोकरी धरल्यावर साठ रुपये पगारावर त्याची बडती झाली. आणि लोकरंजनच्या स्टाफवर आहोत, हे सांगावयाची सोय झाली. अशीच दोन-तीन वर्षे गेली आणि लखूची साहित्यिक धुंदी उतरत चालली. तीन वर्षानंतर का होईना, महाराष्ट्राच्या जीवितविषयक दृष्टीकोनाचा अर्धा अंशही आपण बदलू शकत नाही. याची लखूला जाणीव झाली आणि त्याचे सुख हरपले. म्हणजेच पु.ल.नी लखु रिसबूड यांची दुर्दैवी कर्मकथा विनोदी शैलीतून व्यक्ति केली आहे.

**बापू कणे :**

जगात काही माणसे कवी म्हणून जन्माला येतात. काही नट म्हणून, काही चित्रकार म्हणून, काही गायक म्हणून पण बापू कणे जन्माला आला तो 'सेक्रेटरी' म्हणून. जन्माला येणाऱ्या मुलाला बोलता आले असते तर बापूने स्वतःच्या बारशात देखील 'सेक्रेटरी' पद भूषविले असते. बापू कणेच्या या 'सेक्रेटरी' पदाच्या कार्याची ओळख लेखक अतिशय नेमक्या शब्दात वर्णन करतात ती अशी - " एरवी माझ्या पाहण्यात तरी गेली पंचविसएक वर्षे बापू अनेक संस्थांचे अहवाल वाचत आला आहे. आभाराची भाषणे करीत आला आहे. उतावीळ तरुणांनी ज्या चवीने प्रेमपत्रे लिहिली नसतील त्या चवीने मिनिट्स लिहित आला आहे. कवितासंग्रह वाचावे तशा निरनिराळ्या संस्थांच्या घटना वाचीत आला आहे. पोटनियम तेविस ब ची दुरुस्ती, तहाह्यात सभासद, आमक्या तमक्या आवयान्वये (हा समास करणाऱ्या माणसाची धन्य होय!) मंजूर झालेली घटना, वगैरे वाक्ये त्याच्या तोंडून लीलेने गेली आहेत. आजही जात आहेत." सहकार क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या बापू कणेचे चित्रण अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केले आहे.

बापूला सेक्रेटरी होण्यासाठी कोणत्याही प्रकारची हालचाल करण्याची आवश्यकता नव्हती. माणसाला 'टक्कल पडणे' हे जसे साहजिक आहे, तसेच बापूचे सेक्रेटरी होणे कोणत्याही सभेच्या ठिकाणी बापू हजर असला की, 'तोच या सभेचा सेक्रेटरी आहे' अशी लोकांची समजूत कायम व्हायची. साहित्यसहकारीणी या गावातील संस्थेच्या स्थापनेपासून आजतागायत बापू कणेच तिचा सेक्रेटरी आहे. सुशी म्हणजे बापूची बायको. बापूला रात्री आकरापासून पहाटे पाचपर्यंत केव्हाही जेऊ घालणारी, न सांगता आलेल्या पाहुण्यांची पाने मांडणारी आणि दर दीड वर्षानी कणे कुलाला वाढविणारी सुशी म्हणजे हिंदू स्त्रीच्या सहनशिलतेचा आदर्श होती. बापूचे घर म्हणजे एक अजबखानाच आहे. त्या आडीच खोल्यांच्या बिऱ्हाडात पंचवीस संस्थांची आडगळ आहे. संगीतसेवा मंडळाचे पेटी-तबले, नाट्यनिपुण क्लबच्या ढाली, तलवारी, कारण तिथेही पुन्हा बापूच सेक्रेटरी या सगळ्या आडगळीत ही सात-आठ कणे मंडळी झुरळासारखी राहतात.

### ते चौकोनी कुटूंब :

पु.ल.नी मध्यमवर्गीय कुटुंबातील जीवनपध्दती प्रस्तुत व्यक्तिरेखेद्वारे चित्रित केली आहे. माधवराव आणि मालतीबाई हे जोडपे एखाद्या सभ्य मासिकाच्या कव्हरवर टाकण्यालायक ते जोडपे होते. आमच्या समोरच ते काही दिवसापूर्वी राहायला आले. कुटुंबातील व्यक्तींची संख्या दोन होती. तेव्हापासून तर ती आता चार झाल्यानंतरही मी त्यातल्या श्री. आणि सौं. ना निरनिराळ्या प्रसंगी पहात आलो आहे. धोब्याकडून आलेल्या चादरीसारखे अगदी कुठेही सुरकुती न पडलेल्या कुटुंब! हल्ली बाबा, आई, बाळ आणि बेबी हे चौघांचे चौकोनी कुटुंब त्याच रस्त्यावरुन फिरायला जाताना आढळते. बागेच्या फाटकाच्या आतल्या बाजूला माधवराव आणि बाहेर आम्ही असा माझा आणि त्यांचा पुष्कळदा सुखसंवाद झाला आहे.

'आपल्यासारखा ख्यातनाम लेखक आमच्या समोर राहतो याचा मला आणि आमच्या मिसेसना अभिमान वाटतो.' असे ते नेहमी म्हणतात. माधवरावांच्या घरचे चहापान जपान्यांच्या तोंडात मारणारे असते. माधवरावांच्या घरी मी एक कान स्वैपाकघराच्या दिशेने येणाऱ्या कपबश्यांच्या किनकिनाटावर ठेवून, दुसऱ्या कानाने मुलतानीचा हा निर्जीव नकाशा पाहत होतो. मालतीबाई आणि माधवराव यांचा प्रेमविवाह आहे, हे कळल्यावर मात्र मी जरासा चकित झालो. अगदी कल्पनेचा विस्तार करुनदेखील मला त्यांच्या प्रेमयाचनेचे संवाद डोळ्यापुढे आणता येत नव्हते. या कुटुंबाच्या व्यवहाराला लेखक शब्दबद्ध करतात, ते असे पण हे चौकोनी कुटुंब विलक्षण सुखी आहे. अगदी अमेरिकन पुस्तकांतून सुखीपणाच्या कल्पना असतात तसे सुखी! हा चार जीवांचा ताटवा एकाच कुंडीत वाढतो. वाऱ्या-पावसापासून सुरक्षित शोभिवंत ताटवा! "दुसऱ्याची आस्थेवाईक रितीने चौकशी करा" हा नियम बरहुकूम ती दोघेही शेजाऱ्यापाजाऱ्यांचीदेखील चौकशी करतात. रात्री आर्धा तास नियमाने रेडिओ ऐकतात. रोज फिरायला जातात. स्वतःच्या बागेतील तीच तीच झाडे पाहत पंधरा मिनीटे तिथे हिंडतात. उन्हाळ्यात पंधरा-विस दिवस थंड हवेच्या ठिकाणी जातात." मध्यमवर्गीय लोकांचे जीवन हे चाकोरीबध्द स्वरुपाचे कसे असते याचे मार्मिक चित्रण पहावयास मिळते.

माधवरावांच्या घरी प्रत्येक गोष्ट सुशोभित आणि आखीव रेखीव असे. त्यांच्या घरी जेवण्यापेक्षा पाहण्यातच आनंद असतो. पुष्कळदा गौरीपुढे मांडलेली आरास कुठली नि गौर कुठली हे जसे कळत नाही त्याप्रमाणे जेवण कुठले नि रांगोळ्या कुठल्या ते कळत नाही. अशा लहान कुटुंबात जीवन जगणाऱ्या माधवरावांच्या आमच्या सारखी गाड्या चुकल्याची आणि परिक्षेत नापास झाल्याची स्वप्ने पडत नसावीत. त्यांच्या स्वप्नात काय येत असेल कोण जाणे, पण जे येत असेल ते चौकोनी, गुळगुळीत आणि रंगीत असेल.

### तो :

मराठी साहित्याच्या विश्वात पु.ल.देशपांडे हे सजग शब्द प्रभू म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या शब्द प्रभूत्वाची ओळख या व्यक्तिरेखेतून होते. आम्ही सारे त्याला 'तो' ह्याच नावाने ओळखतो. इतकेच काय पण 'तो' ला आम्ही व्याकरणातले विभक्तीप्रत्ययसुद्धा व्याकरणातल्या कायद्याप्रमाणे लावत नाही. त्याबद्दल बोलताना 'तो' ने असे केले म्हणतो. 'त्याने' केले म्हणत नाही. लौकिकार्थाने 'त्याला' पाळण्यातले नाव आहे. पण आम्ही 'ते' कटाक्षाने घेत नाही. त्याला वडिलांचेही नाव आहे आणि 'तो' ला आडनावही आहे. पण 'ते' आडनाव किंवा नाव सांगितले तर 'तो' बद्दल गैरसमज निर्माण होईल. 'तो' चा देह माणसाचा असला तरी तो स्वेदन, अंडज इत्यादी साऱ्या अंत्यज प्राणीमात्रांच्या गुणावगुणांचा लौकीक समन्वय आहे.

अशा या 'तो' ची भेट कुठे आणि केव्हा झाली ते नेमकं आठवत नाही. आठवण्याचा प्रयत्न केला तरी पाच-सात वर्षापुर्वीचीच आठवते. एका नाटकाच्या थेटरात आम्ही भेटलो. 'तो' चे जीवनसूत्र "घुसा म्हणजे शिरकाव होईल" हे असले पाहिजे. पण हे घुसणे थक्क करणारे आहे आणि या घुसण्यासाठी लागणारी 'तो' ची तयारी अजब आहे. इतिहास, भुगोल, अर्थशास्त्र, न्यायमिमांसा, साहित्य, संगीत, नाट्य, व्यायाम, योगासने, वैद्यक असा एक विषय नाही की, 'तो' तिथे अधिकारवाणीने लिहीत-बोलत नाही. ह्या माणसाबरोबर मुकाबला करणे अशक्य आहे. वर्तमानपत्रातल्या कुठल्या फोटोत कुणाच्या शेजारी तो दिसेल, न्यूजरीलमध्ये केव्हा चमकून जाईल, सांगणे आवघड. कुठल्याही हॉटेलात हा अचानक उपटतो. आमच्या कॉफी हाऊसच्या या ध्यानी बुद्धाच्या चेहऱ्याच्या मॅनेजरशी असेल दोस्ती म्हणून चूप बसलो, तर एकदा ताजमहल हॉटेलमध्ये एका पारशी जोडप्याबरोबर शिरताना मी 'तो' ला पाहिले. 'तो' च्या एकूणच व्यक्तिमत्वाबरोबर जीवनव्यवहाराविषयी लेखक अतिशय नेमक्या भाषेत वर्णन करतात. "ह्या माणसाच्या पोटापाण्याचा उद्योग काय ते मला कळेना, तो कधी झकास मोटारीतून जाताना दिसायचा, कधी टॅक्सीतून, तर एकदोनदा मी 'तो' ला बसच्या थांब्यावरही पाहिला होता. धोतर, नेहरुशर्ट, पायांत जाड वहाणा, डोक्याला काळी टोपी आहे, कधी नाही आणि बगलेत मात्र समर्थाच्या कुबडीसारखे सदैव एखादे जाडसर पुस्तक अशा थाटात तो वावरतो. पण ह्याची दुपार कशी टळते? तो ला प्रपंच असेल का? असले खास देशी प्रश्न माझ्या डोक्यात यायचे"[४३] तो बद्दलची गुढता पु.ल.नी अतिशय नेमक्या शब्दात व्यक्त केली आहे.

### हंड्रेड पर्सेंट पेस्तन काका :

पु.ल.ची व्यक्तिचित्रणे विविधतेने नटलेली दिसतात. त्यापैकीच हे एक. पहाटे मिरजेच्या स्टेशनात गाडी बदलून आम्ही बेंगलूरच्या गाडीतला आमचा डबा हुडकायला सुरुवात केली. फलाटावर घोळका जमलेला पाहिला. रिझर्वेशनच्या चार्ट हातात घेतलेला कंडक्टर त्या घोळक्याच्या मध्यभागी उभा होता. रिझर्वेशन चार्टवर नाव शोधून आम्ही बुगीच्या दिशेने चालून गेलो. आमच्या कंपार्टमेंटमध्ये आधीच एक जोडपे येऊन बसले होते. डब्यात भयंकर घाण सुटली होती. 'काय घाण सुटली आहे! ' माझी पत्नी म्हणाली. त्या पारशी जोडप्यातली

बावाचज म्हणाले, "अरे व्हारी एटार्ट झाली म्हंजे निगून ज्यएल समदा घान." थोडक्यात ती घाण, घाणीचे कारण आणि निर्मूलन यासंबंधीची माहिती देवून बावाजी मोकळे झाले.

काही वेळाने प्रत्यक्ष प्रवासाला सुरुवात झाली. आम्ही चहा-कॉफी मागवली आणि मग नंतर त्या पारशी झोडप्याबरोबर गप्पागोष्टी सुरु झाल्या. आपण खुश भल्या पहाटे साक्षात पारशी बावाजींच्या मुखातून एकदा नाही, तीनदा साला ऐकून म्हणजे काय मजा आहे ते पहाट ही शुचिर्भुत होण्याची वेळ आहे ऐवढेच ठाऊक असणाऱ्यांना कळणार नाही. जवळ जवळ कृष्णाच्या तोंडून गीता ऐकण्यासारखे गाडी सुरु झाली. सरत्या भाद्रपदाचे दिवस. सगळीकडे कसे हिरवेगार मधूनच अबीरबुक्यासारख्या जमिनीचा काळाभोर पट्टा अशा साऱ्या नटलेल्या निसर्गाला न्याहाळीत प्रवास पुढे सरकत होता.

**बबडू :**

पु.ल.नी मध्यमवर्गीय लाकांची जीवनपध्दती कशी चाकोरीबध्द असते ते वेचक आणि वेधक पध्दतीने बबडू या व्यक्तिरेखेद्वारे मांडली आहे. पिशवीत साखर असल्यामुळे देह जावो अथवा राहो पण साखर न भिजो. अशा प्रयत्नात जीव मेटाकुटीला आला होता. पाऊस रिमझीम असल्याने दर तीन मिनीटाला फरक करुन मिटणारी छत्री, अंगातील धोतर आणि साखरेची पिशवी यांचा बचाव करीत मी घराची वाट धरली होती. येणाऱ्या जाणाऱ्या मोटारी धोतरावर चपलेने काढलेल्या चिखलाच्या नक्षीवर स्प्रे प्रेटिंग करीत होता. संकटानी सोबत घेऊन यावे या ह्या नियमाला अनुसरुन त्या वळणावर एक भली मोठी मोटारगाडी आली. जीव, धोतर आणि साखरेची पिशवी या तिन्हीपैकी काय वाचवावे या त्रिधा मनःस्थितीत सापडतो. बघता बघता गाडी जवळ आली वळणाचा रस्ता असल्याने साहजिकच गाडीचा वेग कमी झाला. मी नेहमीच्या सवयीने 'जाऊ द्या, जाऊ द्या' म्हणालो तशी गाडी माझ्यासमोर येऊन थांबली डोळयाला काळा चष्मा लावलेला धिप्पाड शरीराचा एक इसम खाली उतरला. मी त्याच्याकडे आजगळासारखे पहात राहिलो. त्या गृहस्थाच्या चेहऱ्यावर एक स्मिताची रेषा उमटली. आणि त्याच्या डोळयावरचा चष्मा बाजूला सरकताच एकदम माझ्या डोळयात प्रकाश पडला.

बबडूबरोबर त्याच्या गाडीतून घराचा प्रवास सुरु झाला. जुन्या आठवणींना उजाळा देत गाडी मार्गस्थ झाली. बबडूची मराठी फारच बिघडलेली होती. वास्तविक शाळेत असताना तो चांगली मराठी बोलायचा परंतू पाच वर्षाच्या तुरुंगवासात त्याची भाषा बदलली असावी. बबडू आणि लेखकाच्या शाळेतील जीवनाचे चित्रण अतिशय प्रत्ययकारी आहे. ते असे - "आम्हीदेखील शाळेत कमी धाडसी नव्हतो. पण आमची धाडसे पुस्तकी! प्रत्येक मास्तरावरच्यांवर दोन-दोन ओळीच्या विनोदी कविता लिही. त्यावर हस्तलिखीत मासिके काढ, रोज फळयावर प्रसिद्ध बातम्यांची विडंबने करुन लिही. हा धंदा वर्गातल्या मंदा ताम्हणेशी मवाल्यांनी लगट केली तेव्हा आम्ही धावलो नाही. धावला बबडू"पु.ल.नी बबडू आठवणी अत्यंत कुशलतेने व्यक्त केल्या आहेत.

बबडू आणि मी घरी पोहोचलो. घरी पोहोचल्यावर तर बबडूने सिगारेट काढली आणि मलाही विचारले. मी आईपुढे 'नको' असे खुनवून त्याला खिशात ठेवायला सांगितले. त्यानंतर विविध विषयांवर आमच्या गप्पा रंगल्या. शाळेतील घोसलकर मास्तरांविषयीच्या विविध आठवणी रंगल्या. बबडूने त्यांच्या धंद्याविषयी माहिती दिल्यानंतर मी थोडासा हवालदिल झालो. म्हणजेच पु.ल.नी मानवी मनाच्या विविध भावअनुभूतीचा वेध घेतला आहे.

**अन्तू बर्वा :**

पु.ल.ची अतिशय लोकप्रिय आणि समाजमान्य पावलेली व्यक्तिरेखा म्हणे अन्तू बर्वा ही होय. रत्नागिरीच्या त्या मधल्या आळीत देवाने निराळीच घडण केलेले लोकोत्तर पुरुष राहतात. रत्नागिरीच्या लाला चिऱ्याचे, नारळ-फणसाचे, खाजऱ्या आळवाचे आणि फट म्हणतात प्राण कंटाशी आणणाऱ्या या रत्नागिरीतील फळांचे गुण अगदी एकवटून भरले आहेत. अंतू बर्वा याच मातीत उगवला आणि पिकला. वास्तविक ऐकेरी नावाने उच्चारावे असे त्याच वय नव्हते. अतिशय उतारवयाला लागलेले हे व्यक्तिमत्व होते. तरीही प्रेमापोटी त्याला अनेकजण ऐकेरी नावाने बोलवायचे. समोरासमोर कोणी त्यांना अंतू म्हणत नाही. परंतू उल्लेख मात्र सहसा ऐकेरी अंतूला संबोधन 'अंतूशेट' हे चिकटले ते त्याच्या भूतकाळातील जीवन व्यवहारातूनच. असा हा सर्वांनाच आपलेसे करणारा अंतू थोडी जमीन मालकीची दोन वेळच्या भाताची त्याची कुठेतरी सोय आहे. नारळी, पोफळी, रातांबी, हापूस, फणस, चिंच अशी काही वडीलोपार्जित झाडे आहेत. ह्या सगळया आधारावर अंतूशेट उभा आहे. अंतूची पहिली भेट झाली ती बापू हेगिष्ट्याच्या दुकानात. मी सिगारेटी घ्यायला गेल्यावर अर्धा जस्ती काडयांचा चष्मा कपाळावर घेत अंतूशेटनी तडक प्रश्न केला आणि माझी ओळख पटवून घेत बापूलाही माझी ओळख करुन दिली आणि पहिल्याच भेटीत कधीही न तुटणारे नाते अंतूनी माझ्याशी निर्माण केले. 'चहा पिणार का?' असे विचारताच मी 'फार उकडतंय म्हणून नको' म्हणताच अंतू तडक म्हणाला, "रत्नागिरीत उकडायचंच. गोठ्यात निजण्याने बैलाच्या मुताची घाण येते म्हणून भागेल काय? आणि "बापूशेट, पाहुणे लेखक आहेत हो. आमच्या आबा शेट्यासारखी नाटकं लिहिली आहेत. फार बोलू नका. नाहीतर तुमच्यावर लिहीतील एखादा फार्स!" असे म्हणत चिमटाही काढला.

अंतूशेटचा आणि माझा परिचय आता जुना झाला आहे. रत्नागिरीस गेलो तेव्हा मी अंतूशेटला भेटीत राहिलो. त्यांच्या आड्यात त्यांनी मला सामावूनही घेतलं. त्यांच्या आडपात मीही रमलो होतो, पण उतारवयाला आलेल्या या सदस्यांपैकी एखादा मेंबर गळाल्याचे रत्नागिरीच्या फेरीत ऐकिवात यायचे. ऐकूण वाईटही वाटायचे. उरलेल्या मेंबरविषयी आणि शेवटी स्वतःच्या जाण्याविषयी अंतूशेट अगदी मिश्कीलपणाने सहजगतीने सांगत असे. अंतूशेटच्या व्यक्तिमत्वाचे केलेले वर्णन अतिशय नेमके आहे ते असे - "पाच फुटांच्या आतबाहेरची

उंची, तांबूस गोरा वर्ण, तोंडावर बारीक वांगाचे ठिपके, घारे मिचमिचे डोळे, वयोमानाप्रमाणे वाढत चाललेल्या सुरकुत्या, डोक्यावर तेलाच्या कडा उमटलेली टोपी, अंगात अंगरखा, कमरेला गुडघाभर पंचा, पायात कोकणी वहाणा, दातांची अर्धी पंगत उठून गेलेली, त्यामुळे मोकळ्या हिरडयांना जीभ लावीत बोलायची खोड आणि ह्या साऱ्या साजासकट वजन सुमारे शंभर पौंड. ह्या सगळ्या जराजीर्ण होत चाललेल्या गोष्टीत एक गोष्ट ताजी म्हणजे सानुनासिक परंतु सुस्पष्ट आवाज आणि डोक्यावर पिढ्यानपिढ्या थापलेल्या खोबरेल तेलाने दिलेली वंशपरंपरागत तैलबुद्धी."

अंतूशेटच्या या स्वभावचित्रणामुळे साक्षात अंतूशेटची छबी डोळ्यासमोर उभी राहते. गावातील विविध विषयांच्या अंतूशेटच्या अगदी मुळातून होता. राजकारण हा तर अंतूशेटच्या आड्यातला लाडका विषय, प्रत्येक राजकीय पुढारी आणि तत्वप्रणालीवर अंतूशेटचे अगदी मौलिक विचार! मला नेहमी प्रश्न पडे की, ह्या मंडळींची आदराची स्थाने कोणती? जीवनाच्या कुठल्या तत्वज्ञानाचा अर्क ही मंडळी प्याली आहेत देव जाणे! त्यातली निम्म्याहून अधिक माणसे मनिऑर्डरीवर जगतात आणि त्यातले पैसे वाचवून दावे लढवतात.

गेल्या चार-पाच वर्षात मला रत्नागिरीला जाणेच झाले नाही. रत्नागिरीत आता अमूलाग्र बदल झाला होता. वीज आली, कॉलेज आले, डांबरी रस्ते आले मी पुढे जेव्हा रत्नागिरीला गेलो तेव्हा अंतूशेटला विचारले, 'रत्नागिरी झकपक झाली हो तुमची.' त्यावर अंतूशेट म्हणाला, 'छे हो प्रकाशात आमचे दारिद्र्य दिसणार त्यापेक्षा आमचं दारिद्र्य काळोखातच दडलेलं बरं!' कारुणेची आणि गोडव्याची झाक अंतूशेटच्या बोलण्यात मला आढळली. अंतूशेटला मी परदेशी जाणार असल्याचे समजताच त्यांनी मला मिसेसला बरोबर घेऊन जाण्याचे सुचवतच परदेशी जीवनाच्या राहटगाड्याचा पाडाही वाचला.

आम्ही जाण्याचा दिवस पक्का केला. पहाटे पाच वाजता एस. टी. स्टँडवर अंतूशेटची 'जावायबापू' ही खणखणीत हाक ऐकू आली आणि मी चकीतच झालो. अंतूशेटने एक पुडी माझ्या हाती देत 'एवढी पुढी जड नाही खिशाला' असे लाडीळवाणे बजावलेही." एस. टी. सुटली आणि अंतूशेटनी आमच्या कुटूंबीयाबरोबर सदरा वर करुन आपले म्हातारे मिचमिचे डोळे पुसले. तेवढ्या अंधूक प्रकाशात त्यांचे ते खपाटीला गेलेले पोट चटकन् माझ्या डोळ्यावर उगीचच आघात करुन गेले.

कोकणातल्या फळासारखीच तिथली माणसंदेखील खूप पिकल्याशिवाय गोडवा येत नाही त्यांच्यात! "पु.ल.नी अन्तू बर्वा या व्यक्ति चित्रणातून प्रामाणिक आणि सरळ मार्गी जीवन जगणाऱ्या कोकणी माणसाची जीवनपध्दती जिव्हाळयाने व्यक्त केली आहे.

## सारांश :

शेवटी सारांश रुपाने सांगता येते की, मराठी साहित्याच्या क्षेत्रात कथात्मक साहित्याला एक मोठी परंपरा असल्याचे दिसून येते. या परंपरेचा विकास आणि विस्तार स्वातंत्र्योत्तर काळात मोठया प्रमाणात झाला आहे. स्वातंत्र्योत्तर काळापासून ते आजतागायत अनेक वेगवेगळया कथात्मक साहित्यकृतींना अकादमीचा पुरस्कार मिळालेला आहे. या साहित्यकृतींचे स्वरुप आणि मुल्यमापनाच्या अंगाने विचार करता या कलाकृती समकालीनात वेगवेगळया घटक वैशिष्टयांमुळे कशी भिन्न ठरल्या आहेत ते स्पष्ट होते. त्याचबरोबर अकादमीने निवडलेली कलालकृती सर्वोकृष्ट तर असतेच शिवाय ती त्या त्या काळातील वाङ्मय प्रवाहाला कशा दिशा देते ते ही स्पष्ट होते. अशा प्रकारे साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कथात्मक साहित्याचे स्वरुप व मुल्यमापन स्पष्ट होते.

## निष्कर्ष

अकादमीने पुरस्कार दिलेल्या आजवरच्या मराठी कलाकृतीतील निवडक कलाकृतींच्या स्वरुपाचे मुल्यात्मक विवेचन प्रस्तुत प्रकरणात केले आहे. समकालीनात वेगळेपण सिध्द करणाऱ्या तसेच मराठी साहित्याच्या सर्वोत्कष्टतेच्या पातळीवर नेणाऱ्या महत्वपूर्ण कलाकृतींना साहित्य अकादमीने आजवर पुरस्कार दिलेले आहे. या वि.स.खांडेकर, श्री.ना.पेंडसे, पु.ल.देशपांडे, गो.नि.दांडेकरांपासून ते आजच्या पिढीतील राजन गवस, सदानंद देशमुख यांनी आपल्या प्रतिभा कौशल्याने साकारलेल्या कालाकृतींनी या पुरस्काराला गवसणी घातली आहे. या कालाकृती या लेखकांच्या समग्र लेखनात आपले वेगळेपण सिध्द करुन साहित्यात नवा प्रवाह निर्माण करण्यात ते लेखक यशस्वी झ ाालेले आहेत.

पौराणिक, ऐतिहासिक, चरित्र, आत्मचरित्रात्मक, प्रादेशिक, ग्रामीण, दलित अशा वेगवेगळया साहित्य प्रवाहात मराठी साहित्याचे लेखन मोठया प्रमाणात झालेले आहे. या प्रवाहात काळाच्या कसोटीस उतरलेल्या आणि वाङमयीन गुणात्मक दर्जा प्राप्त केलेल्या भिन्नभिन्न प्रकारातील कलाकृतींना अकादमीने आजवर पुरस्कार दिलेले आहेत. या पुरस्कारप्राप्त कलाकृतीतील कथात्मक निवड कलाकृतींच्या स्वरुपाचे विस्तृत विवेचन करुन तिचे मूल्यमापन प्रस्तुत प्रकरणात केले असून या अभ्यासांती खालील काही निष्कर्ष मांडता आले.

## संदर्भ

१. तत्रैव, पृ.२८.
२. तत्रैव, पृ.३९.
३. तत्रैव, पृ.३९.
४. तत्रैव, पृ.५४.
५. तत्रैव, पृ.५९.

६. तत्रैव, पृ.६६, ६७.
७. तत्रैव, पृ.६९.
८. तत्रैव, पृ.७९.
९. तत्रैव, पृ.९०.
१०. तत्रैव, पृ.१०२.
११. तत्रैव, पृ.१०६.
१२. तत्रैव, पृ.११३.
१३. तत्रैव, पृ.१२६.
१४. तत्रैव, पृ.१३६.
१५. तत्रैव, पृ.१४२.
१६. तत्रैव, पृ.१६२.
१७. तत्रैव, पृ.१८१.
१८. तत्रैव, पृ.१९४.
१९. तत्रैव, पृ.१९६.
२०. तत्रैव, पृ.२०२.